205

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी : २४०१०४३७/२४०२०७८१
२४०१४७०१/२४०४४५८९
फॅक्स : २४०२४०६८/२४०२३५१६

कल्पतरु पॉईंट, ३रा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड क्र. ८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

जा.क्र.मप्रनि/प्रवैअ/ब- ५२५७

दिनांक : २८ /०९/२०११

## परिपत्रक

विषय :- नवी मुंबईतील आणि तळोजा क्षेत्रात नविन उद्योगास तसेच विस्तारीकरणास परवानगी देण्याबाबतचे निर्बंध शिथिल करणेबाबत.

संदर्भ :- १. पर्यावरण विभाग यांचे पत्र क्र. व्हीआयपी १०९८/३५६/प्रक्र-४९/कस१,दि.५/०८/२०००

२. पर्यावरण विभाग यांचे पत्र क्र. व्हीआयपी १०९६/प्र.क्र.१३/ता.क्र.२ दि. १५/०६/२००९

३. मंडळाचे पत्र क्र. मप्रनि/प्रवैअ/ब-१६८० दिनांक १९/०३/२०११

४. पर्यावरण विभाग यांचे पत्र क्र. व्हीआयपी १०९६/११/प्र.क्र.१३/ता.क.२ दि. ३०/०७/२०११

---

पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १२/१०/२००७ व १५/०६/२००९ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नवी मुंबई क्षेत्रात नवीन रासायनिक उद्योगांस (डाईंग, प्रिटिंग, प्रोसेसिंग उद्योगांसह) तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या रासायनिक उद्योगांच्या विस्तारीकरणास परवानगी देऊ नये असे कळविले होते. याबाबत मा. मंत्री पर्यावरण यांनी दिनांक १६/०२/२०११ व दिनांक २३/०२/२०११ रोजी आढावा बैठक घेतली होती.

या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०११ रोजीच्या पत्राद्वारे म.प्र.नि.मंडळाने वस्तुनिष्ठ पुर्ननिरिक्षण अहवाल, दिनांक १८ व १९ फेब्रुवारी, २०११ च्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त, नवी मुंबईतील पर्यावरणाचा अहवाल कृती आराखडयाची प्रत पर्यावरण विभागास पाठविली होती.

त्याबाबत, पर्यावरण विभागाने दिनांक ३०/०७/२०११ रोजीच्या पत्राद्वारे वरील बाबतचे निर्बंध शिथिल करण्याबाबतचे खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"नवी मुंबई व तळोजा औद्योगिक क्षेत्रात पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ अनुसार केंद्र शासनाच्या पर्यावरणास व वन मंत्रालयाच्या किंवा राज्य स्तरावर गठीत करण्यात आलेल्या Environment Impact Assessment Authority यांची मान्यता आवश्यक आहे. असे प्रकल्प वगळून, उर्वरित उद्योगांच्या उभारणीस व अस्तित्वातील उद्योगांच्या विस्तारीकरणावर संदर्भ क्र. १ व २ च्या पत्रान्वये घालण्यात आलेले निर्बंध संदर्भ क्र. ४ च्या पत्राने रद्द करण्यात येत आहेत."

तरी वरील निर्देशांचे योग्य ते पालन करण्यात यावे.

(मिलिंद म्हैसकर)
सदस्य सचिव

सहपत्र :- पर्या. विभागाचे दि.३०.७.२०११ चे पत्र

प्रत -

मा. अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी,

१ सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण)/ सह संचालक (हवा प्रदूषण नियंत्रण)/ सहाय्यक सचिव (तांत्रिक)/ सह संचालक (पाम्स)/ प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ मुख्य लेखा अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

२ वरिष्ठ विधी अधिकारी - (विधि व योजना विभाग -१) म.प्र.नि.मंडळ, मुंबई..

३ **प्रादेशिक अधिकारी,** मुख्यालय/ मुंबई/ ठाणे/ कल्याण/ नवी मुंबई/ रायगड/ पुणे/ कोल्हापूर/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर.

४ **उप प्रादेशिक अधिकारी -** मुख्यालय / मुंबई - १/ २/ ३/ ४/ ठाणे - १/ २/ तारापूर - १/ २/ कल्याण - १/ २/ ३/ नवी मुंबई-१/ २/ ३/ तळोजा/ रायगड-१/ २/ रोहा/ महाड/ पुणे-१/ २/ पिंपरी चिंचवड/ सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर/ सांगली/ चिपळूण/ रत्नागिरी/ नाशिक/ जळगांव-१/ २/ अहमदनगर/ औरंगाबाद - १/ २/ ३/ नांदेड/ परभणी/ लातुर/ अमरावती- १/ २/ अकोला/ नागपूर- १/ २/ ३/ चंद्रपूर/ भंडारा.

205

206

## महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. २२८१९५१७
फॅक्स क्र. २२०२५९४६.
ई-मेल . envtc2@gmail.com

क्र.व्हीआयपी १०९६/११/प्रक्र-१३/तांक -२,
**पर्यावरण विभाग,**
१५वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालय,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.
दिनांक - ३०/७/२०११

प्रति,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

110802H0220

विषय - नवी मुंबई आणि तळोजा क्षेत्रात नवीन रासायनिक उद्योगास तसेच विस्तारीकरणास परवानगी देण्याबाबत घातलेले निर्बंध शिथिल करण्याबाबत.

संदर्भ- १) या विभागाचे पत्र क्रमांक १०९८/३५६/प्रक्र-४९/कस-ा-१, दिनांक ५/८/२०००
२) या विभागाचक पत्र क्रमांक व्हीआयपी-१०९६/प्रक्र-१३/तांक-२, दिनांक १५/६/२००९.
३) आपले पत्र क्रमांक मप्रनि/प्रवैअ/ब-१६८०, दिनांक १९/०३/२०११.

महोदय,

"तळोजा औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण रोखण्यासाठी त्या औद्योगिक क्षेत्रात नवीन रासायनिक उद्योगांना अथवा अस्तित्वात असलेल्या रासायनिक उद्योगांना विस्तारीकरणासाठी परवानगी देण्यापूर्वी प्रकल्पाचा सखोल अभ्यास करावा व पर्यावरण विभागाच्या संमतीने उद्योग स्थापण्याचे संमतीपत्र देण्यात यावे" अशा सूचना शासनाच्या संदर्भ क्रमांक १ येथील पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

२. नवी मुंबई क्षेत्रातील वाढते प्रदूषण व पर्यावरण संवर्धनाची निकड लक्षात घेऊन त्या क्षेत्रामध्ये कोणत्याही नवीन रासायनिक उद्योगास (डाईंग. प्रिंटींग, प्रोसेसिंग उद्योगांसह) परवानगी तथा सध्या अस्तित्वात असलेल्या रासायनिक उद्योगांच्या विस्तारीकरणास परवानगी देण्यात येऊ नये ,अशा सूचना शासनाच्या संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

३. यासंदर्भात कळविण्यात येते की, नवी मुंबई व तळोजा औद्योगिक क्षेत्रात पर्यावरण आघात मूल्यांकन अधिसूचना, २००६ अनुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या किंवा राज्यस्तरावर गठीत करण्यात आलेल्या Environment Impact Assessment Authority

206

यांची मान्यता आवश्यक आहे असे प्रकल्प वगळून, उर्वरित उद्योगांच्या उभारणीस व अस्तित्वातील उद्योगांच्या विस्तारीकरणावर संदर्भ १ व २ येथील पत्रान्वये घालण्यात आलेले निर्बंध या पत्रान्वये रद्द करण्यात येत आहेत.

आपला ,

(ज्ञा.ज. भारती )
उपसचिव

प्रत माहितीसाठी अग्रेषित:

(१) मा.मंत्री (पर्यावरण)यांचे खाजगी सचिव

(२) मा.राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव